**नियमित दिवाणी दावा क्र.२३५/२०२२**
मुरलीधर रामभाऊ व इतर
वि.
विठ्ठल नागु व इतर
MHAH190008762022

**<u>आदेश निशाणी क्र.२६ खाली</u>**

१. वादी क्र.०३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होणे करीता वादींतर्फे सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार वादींचे कथन आहे की, वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दि. २०/०१/२०२५ रोजी मयत झाले आहे. त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र सोबत दाखल केले आहे. त्यांचे पश्चात त्यांचे वारसांना प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक आहे. तसेच वादीचे पुढील कथन आहे की, अर्जदार वादी हे आजारी असल्याचे कारणामुळे त्यांना दरम्यानचे काळात मयत वादी क्र.०३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे मुदतीमध्ये वादीस सदरचा अर्ज दाखल करता आलेला नाही. त्यामुळे वादी क्र.०३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर निशाणी क्र.३० अन्वये म्हणणे दाखल केले की, वादींचा अर्ज कायदेशिर तरतुदीस अनसुरुन नाही तसेच अर्जातील करण हे संयुक्तिक नाही. त्यावरुन त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार महादेव मुरलीधर ज–हाड यांचे दि.२०/०१/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूम आदेशाकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. तसेच वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड यांचा मृत्यू दि.२०/०१/२०२५ रोजी झाला परंतु, अर्जदार वादी हे आजारी असल्याने त्यांना न्यायालयात हजर राहुन मयत वादींचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशिर झाला व

वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.१३/०६/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. मुदत कायदा अर्टिकल १२० नुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. मृत्यू दि.२०/०१/२०२५ नंतर दि.१९/०४/२०२५ पर्यंत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु अर्ज दि.१३/०६/२०२५ रोजी दाखल केला आहे म्हणजेच ५५ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसते.

**६.** वादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड मयत झाले असले तरी त्यांच्या वारसांना दावा दाखल करण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा परिपूर्णपणे व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे झालेला विलंब देखील बेसुमार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.२६ वरील आदेश रक्कम रु.२००/– च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीस कॉस्टची रक्कम द्यावी.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.12 11:27:35 +0530

दि.०९/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर,
शेवगाव.